| | |
|---|---|
| | **भुसंपादन निर्देशन दरखास्त क्र.३४/२०२५ मधील निशाणी क्रमांक १ खालील आदेश**<br>**[ CNR No. MHWS050003992025 ]** |

१) धनको/दरखास्तदार मयत बाबुराव नारायणराव कैकाडी यांचे वारस पुरुषोत्तम बाबुराव कैकाडी यांनी न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.३०,५५,६६३/– मिळणेकरिता अर्ज निशाणी क्र.९ दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्या अनुषंगाने ऋणको यांच्या विधीज्ञांनी त्यावर दिलेले त्यांचे म्हणणे विचारात घेतले. धनको यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. पी.एम.भगत यांचा आणि ऋणको क्र. १ व २ यांच्यातर्फे सहा. सरकारी वकील श्री. आर.एम.बेलोकार यांचा आणि ऋण्को क्र. ३ यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. पी.डी.लहाने यांचा युक्तीवाद ऐकला.

३) धनको यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, मयत बाबुराव नारायणराव कैकाडी यांचे वारस पुरुषोत्तम बाबुराव कैकाडी यांनी एल.ए.सी. क्र.९२/२०१४ (जुना एल.ए.सी. क्र.२३०/२०१३ आणि जुना एल.ए.सी. क्र. ५/२०१३) ही दाखल केली होती व ती दिनांक २७.९.२०२४ रोजी निकाली निघालेली आहे. त्या अनुषंगाने धनको यांनी प्रस्तुतची दरखास्त रक्कम रु. ३०,५५,६६३/– च्या वसुलीसाठी दाखल केली आहे. ऋणको यांनी धनको यांना देय असलेल्या रकमेपोटी रक्कम रु.३०,९०,११३/– चा धनादेश न्यायालयाचे सी.सी.डी. नं.१४८/२०२५ अन्वये दिनांक ३०.१०.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. शासनाने कोणतेही अपील मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले नाही व तसा स्थगनादेश नाही.

४) धनको यांच्या विधीज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, मयत बाबुराव कैकाडी यांच्या मृत्यूनंतर त्यांना मुलगा पुरुषोत्तम आणि मुलगी पुष्पा प्रभाकर बडगे असे

दोन कायदेशीर वारस आहेत परंतू नुकसान भरपाईची रक्कम मिळणेसाठी अर्ज पुरुषोत्तम कैकाडी यांनी दाखल केला आहे. तसेच मोबदला रक्कम रुपये ३०,९०,११३/- यामध्ये पुष्पा हिने तिचा हक्क दिनांक १२.२.२००३ रोजी विनामोबदला सोडून दिला आहे व तिची कसलीही हरकत नाही म्हणून मुलगी पुष्पा प्रभाकर बडगे हिने या न्यायालयात हजर राहून तिचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १२ अन्वये दाखल केलेले आहे. तरी भविष्यामध्ये तश्याप्रकारचे अपील झाल्यास व धनको यांचे विरुध्द निकाल लागल्यास धनको रक्कम रु.३०,९०,११३/- न्यायालयात जमा करण्यास धनको पुरुषोत्तम कैकाडी तयार आहेत आणि धनको यांनी निशाणी क्र. १० अन्वये त्याबाबतचे त्यांचे क्षतिपूर्ती बंधपत्र (indemnity bond) दिले आहे. सबब सदरची रक्कम धनको पुरुषोत्तम बाबुराव कैकाडी यांना देण्यात यावी.

५) याउलट ऋणको क्र. १ व २ यांचे तर्फे सहाय्यक सरकारी वकील यांनी आणि ऋणको क्र. ३ यांच्या विधीज्ञांनी ती रक्कम धनको यांना देण्यास हरकत नाही, असा युक्तीवाद केला.

६) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, धनको यांनी एल.ए.सी. क्र.९२/२०१४ (जुना एल.ए.सी. क्र.२३०/२०१३ आणि जुना एल.ए.सी. क्र. ५/२०१३) हा दाखल केला व तो अर्ज तत्कालीन न्यायिक अधिकारी यांनी दिनांक २७.९.२०२४ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार अंशतः मंजूर केला व त्या अनुषंगाने धनको यांनी प्रस्तुतची दरखास्त ही दिनांक ५.७.२०२५ रोजी रक्कम रु.३०,५५,६६३/- च्या वसुलीकरिता दाखल केलेली आहे. तसेच, धनको यांनी त्यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये ३०,९०,११३/- मिळण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज निशाणी क्र. ९ दाखल केलेला आहे.

७) प्रस्तूत अर्जाचे अनुषंगाने सहाय्यक अधिक्षक (वित्त व रोखे), दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर यांचा अहवाल मागविण्यात आला व त्यांनी दिनांक १८.१२.२०२५ रोजी असा अहवाल दिला की, रक्कम रु. ३०,९०,११३/- ही

सी.सी.डी.क्र. १४८/२०२५ अन्वये दि. ३०.१०.२०२५ रोजी जमा केली असून ती खात्यामध्ये जमा आहे.

८) धनको यांनी निशाणी क्र.१० अन्वये त्यांचे बंधपत्र (indemnity bond) १००/- रुपयाच्या स्टॅम्पवर दिले आहे. तसेच प्रस्तूतच्या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय यांचेकडे कोणतेही प्रकरण दाखल केलेले नाही व स्थगीती आदेशही नाही आणि त्यांचेविरुघ्द आदेश पारीत झाल्यास ते सदरची रक्कम व्याजासह न्यायालयात भरतील. पुष्पा प्रभाकर बडगे यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १२ याचे अवलोकन केले तर धनको पुरुषोत्तम बाबुराव कैकाडी हे नुकसान भरपाईची सर्व रक्कम मिळण्यास पात्र आहेत आणि धनको यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तीवादात तथ्य दिसून येते.

९) उपरोक्त सर्व परिस्थिती, धनको यांचे क्षतिपूर्ती बंधपत्र निशाणी क्र.१०, सहाय्यक अधिक्षक (वित्त विभाग) यांचा उपरोक्त अहवाल, पुष्पा प्रभाकर बडगे यांचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १२ आणि धनको यांचे विधीज्ञ यांचा उपरोक्त युक्तीवाद हे सर्व एकत्रीतरित्या विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## <u>आदेश</u>

१] अर्ज निशाणी क्र. ९ मंजूर करण्यात येत आहे.

२] सहाय्यक अधिक्षक (वित्त विभाग), दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर यांनी धनको मयत बाबुराव नारायणराव कैकाडी यांचे वारस पुरुषोत्तम बाबुराव कैकाडी राहणार – आसेगाव, ता.मंगरुळपीर, जि. वाशिम यांना पडताळणीअंती प्रस्तुत दरखास्तीमध्ये दि. ३०.१०.२०२५ रोजी सी.सी.डी.क्र. १४८/२०२५ अन्वये न्यायालयात जमा असलेली रक्कम रु. ३०,९०,११३/-(अक्षरी रक्कम रुपये

तीस लाख नव्वद हजार एकशे तेरा केवळ) ही व्याजासह प्रदान करावी.

३] रक्कम प्रदान केल्याबाबतची नोंद संबंधीत रजिष्टरमध्ये घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.01.13 17:29:47 +0530

स्थळ : मंगरुळपीर.
दिनांक : १३.१.२०२६

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D., Mangrulpir. |
| Date of Decision | : | 13.1.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 13.1.2026 |
| Order uploaded on | : | 13.1.2026 |